# स्वयंसेतूतर्फे स्वच्छता अभियान

संपूर्ण देशभर १६ जानेवारी ते ३१ जानेवारीपर्यंत स्वच्छता पंधरवडा साजरा करण्यात येत आहे. ही खरी तर समस्त भारतीयांसाठी लाजिरवाणी गोष्ट आहे. आपल्या घराची व परिसराची स्वच्छता राखणं हे प्रत्येकाचं आद्य कर्तव्यच आहे. असं म्हणण्यापेक्षा तो एक मूलभूत संस्कार असला असला पाहिजे. परंतु आपल्या भारतीय संस्कृतीचा आवडीने अभ्यास करणाऱ्या पाश्चात्त्यांचे स्वच्छता, स्वावलंबन, श्रमप्रतिष्ठा हे गुण दुर्लक्षित करून त्यांच्या इतर गोष्टींचे अंधानुकरण करण्यात धन्यता मानणारी आजची पिढी हे संस्कार विसरले आहेत. केवळ आपल्या घराची स्वच्छता न करता आपला आजूबाजूचा परिसर प्रत्येकाने स्वच्छ राखणं ही काळाची गरज आहे. केवळ पंधरवडा साजरा न करता नेहमीच आपण स्वच्छता अंगी बाणवून घेतली पाहिजे. तरच आपल्या घराचं, समाजाचं आरोग्य आपण उत्तम राखू शकू. स्वयंसेतूतर्फे झोपडपट्टीमध्ये यापूर्वी स्वच्छता अभियान राबविले गेले होते.

**श्रद्धा कळंबटे**
**संस्थापक, स्वयंसेतू**